सन २०१७-१८ माळेगाव (यात्रा) ता. लोहा, जि. नांदेड येथील विकास कामांना प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक टीडीएस २०१६/१०/प्र.क्र.७५४/ पर्यटन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १६ डिसेंबर, २०१७

संदर्भ : १) जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र क्र.जा.क्र. २०१६/जिनिसं/प्रापयो/माळेगाव/का. ६/२१२६, दिनांक १३.१२.२०१६.

शासन निर्णय :

पर्यटनस्थळाच्या ठिकाणी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी प्रादेशिक पर्यटन योजनेअंतर्गत सन २०१७-१८ मध्ये रु.१७४.०० कोटी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. त्यापैकी ७०% रक्कम रु.१२१.८० कोटी माहे डिसेंबर, २०१७ अखेर वितरणास उपलब्ध आहे.

२. सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध असलेल्या रु.१२१८०.०० लक्ष मधून रु.२२९२.१३ लक्ष वितरीत केले आहेत. उर्वरित (रु.१२१८०.०० लक्ष वजा रु.२२९२.१३ लक्ष) रु.९८८७.८७ लक्ष शिल्लक आहेत. सदर शिल्लक रुक्कम रु.९८८७.८७लक्ष तरतुदीतून माळेगाव (यात्रा) ता. लोहा, जि. नांदेड येथील रु.६९५.३६ लक्षच्या खालील पर्यटन विकास कामांना प्रशासकीय मान्यता देऊन रु.५५०.०० लक्ष इतकी रक्कम जिल्हाधिकारी, नांदेड यांना उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच सदरील कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड ही कार्यान्वयीन यंत्रणा असेल. कामांचा तपशिल खालील प्रमाणे आहे :-

Sr. No.	Works	Amount (Rs.)
1	Cost of Civil Works as per Abstract	
	1. Construction of Darshan Mandap, Anna kshetralaya, Toilet Blocks, Passenger Shed etc. in Yatra and Mandir premises GF FF	 2,02,80,000.00 68,00,000.00
	2. Construction of water tanks for cattles	11,39,400.00
	3. Construction of Dhobi Ghats	18,00,000.00
	4. Parking Area Development in Yatra Ground	6,00,000.00
	5. Construction of Compound wall	50,40,000.00
	6. Seating arrangement for public around the Kusti Maidan (Stepped arrangement)	12,56,000.00
	7. Construction of WBM roads in Yatra Maidan	7,20,000.00
	8. Construction of CC roads	72,50,000.00
	9. Renewal of Existing B.T. Roads in Yatra Maidan	15,00,000.00
	10. Construction of CD works	6,00,000.00
	11. Construction of Yatra Kaman/ Gates	40,00,000.00
	Total (1)	**5,09,85,400.00**
2	Electrification a) External/ MSEB charges etc. b) Internal Electrification & Street lights (11% on proper building cost)	29,78,800.00
3	Fire Fighting Arrangement	3,00,000.00
4	Bore well, Sump well, Pumps and Pump house	4,00,000.00
5	ETP charges (Survey, Structural Design, Plan, Estimate) 1.25%	6,37,318.00
6	Add8% Water supply and sanitation (on proper building cost)	21,66,400.00
	Total (1 & 2 to 6)	**5,74,67,918.00**
7	Contengencies 4%	22,98,717.00
8	Centage charges 5.%	28,73,396.00
9	Add 12% G.S.T.	68,96,150.00
	Total	**6,95,36,181.00**

(अक्षरी रुपये सहा कोटी पंच्याणव लक्ष छत्तीस हजार एकशे एक्याऐंशी फक्त)

३. प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभाग शासन परिपत्रक दिनांक १८.४.२०१७ च्या परिच्छेद ७ ते १८ मधील प्रत्येक अटीची खालील प्रमाणे पुर्तता करण्यात आली आहे.

अ.क्र.	परिपत्रकातील परिच्छेत क्र.	विषय	विभागाचे अभिप्राय
१	७-अ	एखाद्या योजनेस / प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे	या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.
२	७-ब	अर्थसंकल्पिय तरतूद करणे आवश्यक असते (योजनांतर्गत नियतव्यय उपलब्ध) व अर्थसंकल्पित करणे	अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध आहे.
३	८	प्रशासकीय विभागांना वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१ वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/ विनियम, दि.१५/५/२००९ अन्वये अधिकार असणे	वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला,उप विभाग एक अ.क्र. २७ नियम क्र. १४९ नुसार प्रशासकीय विभागांना पुर्ण अधिकार आहेत. तसेच वित्त विभाग, परिपत्रक, क्रमांक- संकीर्ण २०१७/प्र.क्र. ७५/अर्थ ३, दिनांक १८/४/२०१७ अन्वये विभागास अधिकार प्रदान केले आहेत.
४	९	विविध शासकीय / प्रशासकीय संस्थांना तसेच अनुदानित संस्थांना सहायक अनुदाने मंजूर करण्यापूर्वी त्यांचेकडून पूर्वी खर्च केलेल्या अनुदानाची अपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेणे	यापूर्वी या कामास निधी वितरीत केलेला नाही. त्यामुळे लागू नाही.
५	१०	विभागाद्वारे संक्षिप्त देयकाद्वारे निधी खर्च करण्यात येतो. त्याचे तपशीलवर देयक सादर न केल्यामुळे लेखा आक्षेप येतात व अपहार संभवतात.	संक्षिप्त देयकाद्वारे निधी काढण्यात येत नाही.
६	११	स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने	लागू नाही.
७	१२	वैयक्तिक लाभर्थीच्या योजनेची देयके	लागू नाही.
८	१३	शिष्यवृत्ती / शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती, वैयक्ति काभार्थी यांच प्रदाने	लागू नाही.
९	१४	बांधकाम विषयक प्रस्तावासंदर्भात प्र.मा./तां.मा. तसेच आवश्यक तेथे सचिव समितीची मान्यता	सचिव समितीची मान्यता प्राप्त.
१०	१५	दुय्यम कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी अशा खरेदीसाठी रितसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढण्यात यावेत	खरेदी नसल्याने लागू नाही.

११	१६	साहित्य खरेदीची प्रक्रिया पुर्ण करुन पुरवठादार निश्चित झाल्याशिवाय खरेदीची देयके कोषागारातून आहरित करण्यात येऊ नये.	लागू नाही.
१२	१७	विविध करणांमुळे अखर्चित राहिलेला निधी विभागांची त्यांच्या अधिनस्त् महामंडळाकडे हस्तांतरीत करुन तांत्रिकद्दष्टया खर्च झाल्याचे दाखविले जाते.	लागू नाही.
१३	१८	विभागांमार्फत करण्यात येणारे संगणकीकरण संदर्भातील खर्च शासनाचे दरपत्रकानुसार/ निविदाद्वारे करण्यात यावा.	लागू नाही.

४. तसेच वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दि.१८/४/२०१७ च्या परिशिष्टामधील तपासणी सूचीतील अ.क्र. १,२ व ३ ची पुर्तता करण्यात आली आहे. अनुक्रमांक ४ बाबत स्पष्ट करण्यात येते की, लेखापरीक्षक/महालेखापाल यांचे कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत. यापूर्वी वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहेत.

५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.३४/कोषा.प्रशा-५, दि.२४/७/२०१५ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार खालील प्रमाणे प्रमाणित करण्यात येत आहे :-

तपासणी सूची	पर्यटन विभागाचे अभिप्राय
योजनेस प्रशासकीय मान्यता	या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.
निधी वितरण शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पुर्तता झाल्यानंतरच होणार आहे.	होय.
३ महिन्यापूर्वी वितरीत केलेल्या निधीपैकी ७५% खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र	यापूर्वी या कामास निधी वितरीत केलेला नाही. त्यामुळे लागू नाही.
यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत.	नाही.
निधी लाभार्थ्याच्या थेट खात्यात जमा होणार आहे.	लागू नाही.
वस्तु खरेदी करण्यापूर्वी नियमित वापरात येणा-या वस्तुंच्या बाबतीत त्याचे रितसर खरेदी नियोजन (Procurement plan) करावे व अकारण शिल्लक साठा (inventory) असून नये.	लागू नाही. ही वस्तु खरेदी नाही.
भांडवली वस्तु खरेदी करण्यापूर्वी यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची यथास्थित नोदं dead Stock रजिस्टर मध्ये घेण्यात आली असून त्याचा योग्य वापर झाला असून त्या पडून नाहीत, असे प्रमाणपत्र.	भांडवली वस्तु खरेदीचे प्रकरण नाही. लागू नाही.
यामधून खरेदी होणार असल्यास प्रत्यक्ष वस्तु प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयक अदा केले जाणार आहे.	ही वस्तु खरेदी नाही.

आवश्यक त्या ठिकाणी आदिवासी / सामाजिक न्याय विभाग यांची निधी वितरणास सहमती आहे.	आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभागाचा संबंध नाही.
प्रस्तुत योजनेत कोणतेही १ वर्ष जुने संक्षिप्त देयक त्याच लेखाशीर्षाखाली प्रलंबित नाही.	कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही
निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे.-	नाही. संबंधित कार्यान्वियिन यंत्रणेस निधी वितरीत करण्यात येतो.

६. सन २०१७-१८ मध्ये रु.१७४.०० कोटी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. त्यापैकी ७०% रक्कम रु.१२१८०.०० लक्ष माहे डिसेंबर, २०१७ अखेर वितरणास उपलब्ध असून त्यापैकी रु.२२९२.१३ लक्ष वितरीत केले आहेत. उर्वरित (रु.१२१८०.०० लक्ष वजा रु.२२९२.१३ लक्ष) रु.९८८७.८७ लक्ष शिल्लक रकमेतून माळेगाव (यात्रा) ता. लोहा, जि. नांदेड येथील वर नमूद केलेल्या कामांना रु.५५०.०० लक्ष इतकी रक्कम जिल्हाधिकारी, नांदेड यांना या शासन निर्णयाव्दारे अदा करण्यास शासन खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देत आहे :-

अटी व शर्ती :-

१) वितरीत केलेल्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि विविध नियमांतर्गत नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात यावे.

२) कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित जिल्हधिकारी यांची राहील व जादा खर्चासाठी जादा अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही. तसेच कार्यान्वयीन यंत्रणा पूर्वीच्या आदेशात नमूद केल्या प्रमाणेच राहील.

३) मंजूर तरतुदीतून करावयाचा खर्च ३१ मार्च, २०१८ पर्यंत करण्यात यावा व मंजूर कामे तात्काळ पूर्ण करावीत.

४) पर्यटन विभागाने केलेल्या कामाच्या ठिकाणी पर्यटन विभागाचे माहिती फलक लावण्यात यावेत.

५) निधी मंजुर केलेल्या कामांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या इतर कोणत्याही योजनांतर्गत (तिर्थक्षेत्र विकास /केंद्र पुरस्कृत योजना वगैरे) अधिाच निधी मंजूर झालेला असल्याच त्या कामासाठी हा निधी वापरता येणार नाही. **जिल्हाधिकारी, नांदेड यांनी वरील कामांना अन्य कोणत्याही योजनांतर्गत निधी मंजूर केलेला नाही, याची खात्री करुन तद्नंतरच संबंधिच कार्यान्वयीन यंत्रणेला निधी वितरीत करावा. जर अन्य योजनेखाली निधी आधीच मंजूर असेल तर अशा कामांचा निधी शासनास त्वरीत परत करावा.**

६) ज्या संदर्भात निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे त्या प्रत्येक योजनेच्या संदर्भात वित्तीय अधिकाराच्या प्रत्यावर्तनानुसार सक्षम प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

७) अशा प्रत्येक योजनेबाबत करावयाच्या बांधकामासंदर्भात अथवा खरेदीबाबत किंवा सेवा पुरवठा कराराबाबत वित्तीय नियमांप्रमाणे आवश्यक ती कार्यपध्दती पाळणे आवश्यक आहे. या संदर्भात शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-संकीर्ण-१००२/प्र.क्र.१५/कोषा-प्र ५, दि. ६ फेब्रुवारी, २००२ च्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने घ्यावी. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.बीजीटी-१०.००/प्र.क्र.५६/२०००/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१ मधील उपाययोजनांची अंमलबजावणी तंतोतंतपणे करण्यात यावी.

८) तांत्रिक मान्यता विहित स्तरावर घेण्यात यावी.

९) रस्त्यांच्या प्रस्तावित कामांच्या प्रकरणांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१०) योजनेत्तर स्वरुपाच्या कामासाठी (देखभाल/दुरुस्ती इ.) सदरची तरतूद उपयोगात आणली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

११) सदर कामांपैकी जी कामे तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी प्रस्तावित करुन देवस्थान/संस्थेच्या जागेवर करण्यात येणार आहेत अशा कामांसंदर्भात सदर देवस्थान/संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील. तसेच अशा कामाच्या पूर्णत्वानंतर त्या संदर्भातील देखभाल/दुरुस्ती, संबंधित संस्थेने करण्यासंदर्भात जिल्हाधिका-यांनी संबंधित देवस्थान / संस्थेबरोबर करारनामा करणे बंधनकारक राहील. अशा प्रकारच्या देखभाल दुरुस्तीकरीता शासनाकडून यापुढे कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी व तशी अट करारात अंतर्भूत करण्यात यावी. तसेच या कामामुळे निर्माण होणाऱ्या सर्व सुविधा तसेच पर्यटन स्थळ सर्व नागरीकांसाठी खुले राहील, अशी अट करारात समाविष्ट करण्यात यावी.

१२) सदर निधीतून होणाऱ्या खर्चातून करावयाच्या कामांची भौतिक प्रगती तसेच निधीतून होणा-या खर्चाची मासिक विवरणपत्रे दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास न चुकता सादर करावीत. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला आणि निधीबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र न चुकता शासनास व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास सादर करण्यात यावे.

१३) सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या देखभालाची तसेच इतर अनुषंगिक कामांची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित संस्था यांची राहील.

१४) वर नमूद करण्यात आलेला खर्च हा सन २०१७-१८ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून मुख्यलेखाशीर्ष "मागणी **क्रमांक झेडडी-४, ३४५२-पर्यटन, पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, १०१ पर्यटन केंद्रे (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (१८) पर्यटन विकासासाठी विविध ठिकाणांसाठी मूलभूत सुविधांकरीता अनुदान (३४५२ १९५८) ३१-सहायक अनुदान"** या लेखा शिर्षाखाली मंजुर तरतूदीमधून भागविण्यात यावा. या प्रकरणी मंजूर करण्यात आलेल्या (प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत) सहायक अनुदानाची रक्कम आहरीत करुन संबंधितांना वितरीत करण्याकरीता सहायक जिल्हा नियोजन अधिकारी/ जिल्हा नियोजन अधिकारी, नांदेड यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व संबंधित जिल्हाधिकारी, नांदेड यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम जिल्हा कोषागार कार्यालयात देयके सादर करुन संबंधितांना रक्कम वितरीत करण्यात यावी.

१५) हा शासन निर्णय, वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थस-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/४/२०१७ व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थस- २०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०/६/२०१७ तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग- पहिला, उप विभाग एक अ.क्र.२७ नियम क्र.१४९ प्रशासकीय विभागांना दिलेल्या अधिकारानुसार तसेच सचिव समितीच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२१८११२५२३५९२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sanjay Muralidhar Bhandarkar

Digitally signed by Sanjay Muralidhar Bhandarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cdd45052fa50caf1393f2d69336398531946d55f956eed5c11cf1d860441389f, serialNumber=2f5d35a4de9923985b0d6fddf89ad5cdc0132acbe4decd040b457407bbf2d1d7, cn=Sanjay Muralidhar Bhandarkar
Date: 2017.12.18 11:34:09 +05'30'

(सं. मु. भांडारकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. मंत्री(पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

४. मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा, विधानभवन, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेता विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
७. मा.सर्व विधान परिषद सदस्य.
८. मा.सर्व विधानसभा सदस्य.
९. महालेखापाल, महाराष्ट्र - १/ २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
१०. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
११. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
१२. जिल्हाधिकारी, नांदेड.
१३. जिल्हा नियोजन अधिकारी, नांदेड.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड.
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१७. नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.
१८. वित्त विभाग (का.व्यय-१४/अर्थोपाय / अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई.
१९. अवर सचिव, (अर्थसंकल्प शाखा) पर्यटन व सांस्कृतिक विभाग,मंत्रालय, मुंबई.
२०. निवड नस्ती, कार्यासन-पर्यटन.